महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण - २०१७/प्र.क.१७३/२०१७/म-७
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: ०७ ऑक्टोबर, २०१७

वाचा -

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: एससीवाय - २०१३ / प्र.क्र.२०७ / म-७, दिनांक ३.११.२०१५
२) दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६ (Manual for Drought Management २०१६)

प्रस्तावना -

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये पीक पैसेवारी बाबत सर्वसमावेशक शासन आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ११ व १२ मध्ये राज्यात दुष्काळ जाहीर करण्याचे निकष व दुष्काळ जाहीर करण्याची पध्दती विहित करण्यात आली आहे. सदर निकष व कार्यपध्दती केंद्र शासनाच्या दुष्काळ व्यवस्थापन संहिता २००९ मधील तरतुदीनुसार विहित करण्यात आली आहे.सध्या वेगवेगळया राज्यामध्ये दुष्काळ जाहीर करण्यासाठी वेगवेगळी कार्यपध्दती अवलंबिवण्यात येत आहे. सध्याच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार दुष्काळ जाहीर करण्यासाठी आणेवारी/पैसेवारी/ग्रीडवारी ही पध्दत व नजर पाहणी आणि पीक कापणी प्रयोगामध्ये दिसून आलेल्या नुकसानीच्या अंदाजावरून दुष्काळ जाहीर करण्यात येतो. केंद्र शासनाने आता दुष्काळ व्यवस्थापन संहिता २००९ मध्ये सुधारणा करून सुधारित दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ प्रकाशित केली आहे. दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६ मध्ये दुष्काळ जाहीर करण्यासाठी शास्त्रीय निकष व सुधारित कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. सदर सुधारित निकष व कार्यपध्दती विचारात घेवून राज्यामध्ये दुष्काळ जाहीर करण्याचे निकष व कार्यपध्दती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये राज्यामध्ये दुष्काळ घोषित करण्यासाठी विहित केलेले निकष व कार्यपध्दती या शासन निर्णयान्वये सुधारित करण्यात येत असून खरीप २०१७ हंगामापासून पुढे राज्यामध्ये दुष्काळ जाहीर करण्याचे निकष व कार्यपध्दती खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे.

२. राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर देखरेख ठेवण्यासाठी प्रामुख्याने पर्जन्यमान, वनस्पती निर्देशांक, मृदू आर्द्रता निर्देशांक, जलविषयक निर्देशांक व पिकांचे क्षेत्रिय सर्वेक्षण/सत्यापन विचारात घेण्यात यावेत .या निर्देशाकांच्या परिमाणांवर देखरेख ठेवण्यात यावी. दुष्काळ घोषित करण्यासाठी विचारात घ्यावयाच्या निर्देशांकाचा तपशील खालीलप्रमाणे राहील:-

१) **अनिवार्य निर्देशांक (Mandatory Indicators)**

अ) **पर्जन्यमानाशी निगडीत निर्देशांक** -:

i) पर्जन्यमानाचे विचलन (Rainfall Deviation)
ii) पर्जन्यमानातील खंड - पर्जन्यमानात ३ ते ४ आठवडे खंड पडल्यास
iii) जून व जूलै या महिन्यांमध्ये एकूण सरासरी पर्जन्याच्या ५०% पेक्षा कमी पाऊस झाला असल्यास दुष्काळाची प्रथम कळ (Trigger-१) लागू होईल.

iv) जून ते सप्टेंबर या मान्सून कालावधीतील सरासरी पर्जन्यमान ७५% पेक्षा कमी असल्यास तरीदेखील दुष्काळाची प्रथम कळ (Trigger-१) लागू होईल.

$$\text{पर्जन्यमानाचे विचलन (RFdev)} = \left[\frac{\text{(वर्तमान पर्जन्य - सरासरी पर्जन्य)}}{\text{सरासरी पर्जन्य (पर्जन्यमान मिलीमीटरमध्ये)}}\right] \times १००$$

स्पष्टीकरण :-

- वर्तमान व सरासरी पर्जन्याची आकडेवारी विचारात घेताना ती सारख्याच कालावधीची असावी. उदा. जून अखेरचे पर्जन्यमानाचे विचलन काढताना जून महिन्या अखेरचे वर्तमान कालावधीतील एकूण पर्जन्य व जून महिन्या अखेरचे सरासरी पर्जन्य विचारात घ्यावे. तसेच जूलै अखेरचे पर्जन्यमानाचे विचलन काढताना जून व जूलै अखेरचे वर्तमान कालावधीतील एकूण पर्जन्य व जूलै अखेरचे सरासरी पर्जन्य विचारात घ्यावे.
- मान्सून सुरू झाल्यानंतर जून महिन्याच्या अखेरपासून प्रत्येक महिन्याचे पर्जन्यमानाचे विचलन परिगणित करण्यात यावे.
- पर्जन्यमानाचे विचलन हे तालुकानिहाय काढण्यात यावे.
- जुन महिन्यापासूनचे पर्जन्यमानाचे विचलन काढताना तालुकानिहाय काढण्यात यावे. याकरिता मदत व पुनर्वसन विभागाने , शासन निर्णय, दिनांक १८.३.२००६ अन्वये निश्चित केलेले सरासरी पर्जन्य विचारात घ्यावे.
- वर्तमान पर्जन्यमानाची आकडेवारी www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरून तालुकानिहाय प्राप्त करून घ्यावी.

२) प्रभावदर्शक निर्देशांक (Impact Indicators)

अ) वनस्पतीशी निगडीत निर्देशांक (Vegetation Related Indices)

वनस्पतीशी निगडीत निर्देशांकामध्ये खालील दोन निर्देशांक विचारात घेण्यात यावेत.

१) सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (Normalized Difference Vegetation Index) / सामान्य फरक आर्द्रता निर्देशांक (Normalized Difference Wetness Index)

२) वनस्पती स्थिती निर्देशांक (Vegetation Condition Index)

१) सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (Normalized Difference Vegetation Index) / सामान्य फरक आर्द्रता निर्देशांक (Normalized Difference Wetness Index)

- सन २००६ ते २०१६ या कालावधीतील प्रत्येक महिन्याचा व चालू वर्षातील वर्तमान महिन्यांचा NDVI व NDWI या निर्देशांकाचा तालुकानिहाय तपशील http://www.ncfc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तेथे उपलब्ध असलेल्या मूल्यावरून $NDVI_{dev}$ व $NDWI_{dev}$ याचे तालुकानिहाय मुल्य खालील सुत्रानुसार काढावे.
- हे निर्देशांक काढण्यासाठी NDVI व NDWI या निर्देशांकाचा तालुकानिहाय तपशील http://www.ncfc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यानुसार सदर निर्देशांकाचे मूल्य खालील सूत्रानुसार तालुकानिहाय परिगणित करावे.

$$NDVI_{dev} = [(NDVI_i - NDVI_n) / NDVI_n] \times १००$$

$$NDWI_{dev} = [(NDWI_i - NDWI_n) / NDWI_n] \times १००$$

$NDVI_i$ /$NDWI_i$ म्हणजे http://www.ncfc.gov.in या संकेतस्थळावर दर्शविण्यात आलेले चालू वर्षातील वर्तमान महिन्याचे संबंधित तालुक्याचे निर्देशांक

$NDVI_n$/$NDWI_n$ म्हणजे http://www.ncfc.gov.in या संकेतस्थळावर दर्शविण्यात आलेल्या सन २००६ ते २०१६ या कालावधीतील त्याच वर्तमान महिन्यांच्या संबंधित तालुक्यांच्या निर्देशकांची सरासरी काढून येणारे मूल्य होय.

- $NDVI_{dev}$ व $NDWI_{dev}$ यांचे मूल्य वरील सूत्रानुसार काढण्यात आल्यानंतर या दोन्हीपैकी खराब परिस्थिती दर्शविणारे परिमाण संबंधित तालुक्याचे $NDVI_{dev}$ / $NDWI_{dev}$ परिमाण म्हणून विचारात घ्यावे.
- $NDVI_{dev}$/$NDWI_{dev}$ यांचे परिमाण - २०% ते - ३०% असल्यास मध्यम दुष्काळ सुचित होतो (Moderate Drought Condition). तसेच हे मूल्य - ३०% पेक्षा कमी असल्यास गंभीर दुष्काळ सुचित होतो (Severe Drought Condition). या विचलनाचे मूल्य - २०% पेक्षा अधिक असल्यास परिस्थिती सामान्य असल्याचे सूचित होते.

२) <u>वनस्पती स्थिती निर्देशांक (Vegetation Condition Index)</u>

- सदर निर्देशांकाचे मूल्य तालुकानिहाय परिगणित करावे.
- जुलै महिन्यापासून हे निर्देशांक तपासण्यात यावे.
- NDVI व NDWI निर्देशकाच्या परिमाणांवरून वनस्पती स्थिती निर्देशांक (VCI) खालील सूत्रानुसार परिगणित करण्यात यावा:

$$VCI\ (NDVI) = [(NDVI_{curr} - NDVI_{min}) / (NDVI_{max} - NDVI_{min}] \times १००$$

$$VCI\ (NDWI) = [(NDWI_{curr} - NDWI_{min}) / (NDWI_{max} - NDWI_{min}] \times १००$$

- $NDVI_{curr}$/$NDWI_{curr}$ म्हणजे http://www.ncfc.gov.in या संकेतस्थळावर दर्शविण्यात आलेले चालू वर्षातील वर्तमान महिन्याचे संबधित तालुक्याचे NDVI/NDWI निर्देशांकाचे मूल्य. ज्या महिन्यासाठी निर्देशांक परिगणित करावयाचे आहे त्याच महिन्याचे चालू वर्षातील $NDVI_{curr}$/$NDWI_{curr}$ विचारात घ्यावे.

- $NDVI_{min}$/$NDWI_{min}$ म्हणजे http://www.ncfc.gov.in या संकेतस्थळावर दर्शविण्यात आलेल्या सन २००६ ते २०१६ या कालावधीमधील त्याच महिन्याचे संबधित तालुक्यासमोर दर्शविण्यात आलेल्या NDVI/NDWI च्या मूल्यांपैकी किमान (minimum) मूल्य

- $NDVI_{max}$ /$NDWI_{max}$ म्हणजे http://www.ncfc.gov.in या संकेतस्थळावर दर्शविण्यात आलेल्या सन २००६ ते २०१६ या कालावधीमधील त्याच महिन्याचे संबधित तालुक्यासमोर दर्शविण्यात आलेल्या NDVI/NDWI च्या मूल्यांपैकी कमाल (maximum) मूल्य.

- वरील सूत्रानुसार VCI (NDVI) व VCI(NDWI) परिगणित करावे.
- VCI (NDVI) व VCI (NDWI) या दोन्ही निर्देशांकाचे मूल्य परिगणित केल्यानंतर या दोन्हीपैकी खराब स्थिती दर्शविणारे VCI मूल्य संबंधित तालुक्याचा संबंधित महिन्याचा VCI निर्देशांक म्हणून विचारात घ्यावा

- वनस्पती स्थिती निर्देशांक (VCI) चे वरील सूत्रानुसार येणारे मूल्य विचारात घेवून त्यांच्या मूल्यानुसार वनस्पती स्थितीची वर्गवारी खालीलप्रमाणे राहील :

वनस्पती स्थिती निर्देशांक (VCI) (%)	वनस्पती स्थिती
६०-१००	चांगले (Good)
४०-६०	साधारण (Fair)
२०-४०	वाईट (Poor)
०-२०	अतिशय वाईट(Very Poor)

ब) लागवडीखालील क्षेत्र (Area Under Sowing)

- लागवडीखाली आलेल्या क्षेत्रावरून देखील दुष्काळाची व्याप्ती व प्रकार सुचित होतो. त्यामुळे या निर्देशांकावरून दुष्काळी परिस्थितीचे मुल्यांकन करण्यात यावे.
- राज्याच्या पीक पेरणीच्या वेळापत्रकानुसार ऑगस्ट अखेरपर्यंत राज्यामध्ये खरीप हंगामात पेरणी होणारे सामान्य/सरासरी क्षेत्र व संबंधित वर्षामध्ये ऑगस्ट अखेर खरीप हंगामात प्रत्यक्ष पेरणी झालेल्या क्षेत्राचे प्रमाण ३३.३% किंवा त्यापेक्षा कमी असल्यास अशी परिस्थिती दुष्काळी परिस्थिती सूचित करते. मात्र हेच प्रमाण ५०% पेक्षा कमी असल्यास गंभीर दुष्काळ सूचित करते.
- ऑगस्ट महिना अखेरीस पासून फेब्रुवारी महिन्यापर्यंत दरमहा याची आकडेवारी विचारात घेण्यात यावी.
- ऑगस्ट अखेर खरीप हंगामात पेरणी होणारे सामान्य/सरासरी क्षेत्र निश्चित करताना केवळ मागील एका वर्षाचीच आकडेवारी विचारात घेवू नये. याकरिता मागील किमान ५ वर्षातील ऑगस्ट अखेरच्या पेरणीच्या सरासरी क्षेत्राची आकडेवारी विचारात घेण्यात यावी.
- रब्बी हंगामाच्या बाबतीत डिसेंबर अखेर पेरणी होणारे सरासरी क्षेत्र व प्रत्यक्ष पेरणी झालेल्या क्षेत्राचे प्रमाण ५०% पेक्षा कमी असल्यास अशी स्थिती दुष्काळी परिस्थिती सूचित करते.
- पेरणीचे सरासरी क्षेत्र व प्रत्यक्ष झालेल्या पेरणीचा तपशील जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचेकडून उपलब्ध करून घ्यावा.

क) मृदु आर्द्रता निर्देशांक (Soil Moisture Based Indices)

- दुष्काळी परिस्थितीचे मुल्यमापन करण्यासाठी मृदुमधील आर्द्रतेचा उपयोग करता येतो. मृदु आर्द्रतेशी निगडीत खालील दोन निर्देशांक यासाठी विचारात घेण्यात आले आहेत.

  i) मृदु आर्द्रतेची टक्केवारी (Percent Available Soil Moisture)
  ii) आर्द्रता पुरेशीपणा निर्देशांक (Moisture Adequacy Index)

- मृदु आर्द्रतेची टक्केवारी (PASM) या निर्देशांकाचा तपशील सध्या उपलब्ध नसल्यामुळे राज्यातील दुष्काळ परिस्थितीचे मुल्यमापन करण्यासाठी उपरोक्त दोन निर्देशांकापैकी आर्द्रता पुरेशीपणा निर्देशांक (MAI) विचारात घेण्यात यावे.

- आर्द्रता पुरेशीपणा निर्देशांक (MAI) याचा **जिल्हानिहाय व महिनानिहाय** तपशील केंद्र शासनाच्या महालनोबीस नॅशनल क्रॉप फोरकास्ट सेंटर, नवी दिल्ली (MNCFC) या संस्थेच्या http://www.ncfc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिला जातो.
- सदर तपशीलावरून या निर्देशांकाचे जिल्हानिहाय परिमाण विचारात घ्यावे.
- सदर निर्देशांक जुलै महिनाअखेरीस पासून फेब्रुवारी महिन्यापर्यंत दरमहा तपासावे.
- आर्द्रता पुरेशीपणा निर्देशांक (Moisture Adequacy Index) चे मूल्य विचारात घेवून त्यांच्या मूल्यानुसार कृषीविषयक दुष्काळाची वर्गवारी खालीलप्रमाणे राहील :

आर्द्रता पुरेशीपणा निर्देशांक (Moisture Adequacy Index) (%)	कृषीविषयक दुष्काळ वर्गवारी (Agricultural Drought Class)
७६-१००	दुष्काळ नाही
५१-७५	सौम्य दुष्काळ(Mild)
२६-५०	मध्यम दुष्काळ (Moderate)
०-२५	गंभीर दुष्काळ (Severe)

ड) जलविषयक निर्देशांक (Hydrological Indices)

- जलविषयक निर्देशांकापैकी जलसाठा निर्देशांकाची माहिती राज्यातील सर्व जलसाठयासंदर्भात सध्या उपलब्ध नसल्यामुळे याचा वापर करणे शक्य होणार नाही. प्रभावदर्शक निर्देशांकापैकी कोणतेही एक निर्देशांक वापरावयाचे असल्यामुळे दुष्काळी परिस्थितीचे मुल्यमापन करण्यासाठी भूजल पातळी निर्देशांक (GWDI) वापरण्यात यावे.भूजल पातळी निर्देशांकाची तालुकानिहाय आकडेवारी ऑक्टोबर २०१७ पासून दरमहा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडून परिगणित केली जाणार असल्यामुळे सदर निर्देशांक तालुकानिहाय वापरण्यात यावे.

१) भूजल पातळी निर्देशांक (Groundwater Drought Index)

- राज्यातील भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडून या निर्देशांकाची तालुकानिहाय आकडेवारी प्रत्येक वर्षी दर तीन महिन्यांनी प्रसिध्द केली जाते. यापुढे चालू वर्षातील ऑक्टोबर महिन्यापासून सदर निर्देशांकाची तालुकानिहाय आकडेवारी दरमहा परिगणित करण्याची कार्यवाही भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडून केली जाणार आहे.
- या निर्देशांकाचा तालुकानिहाय तपशील जिल्हाधिकारी यांनी जिल्हास्तरावरील वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचेकडून उपलब्ध करून घ्यावा व या निर्देशांकाचे मुल्यांकन करावे. या निर्देशांकाच्या विश्लेषणासाठी जिल्हास्तरावरील वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांची मदत घेण्यात यावी.
- हे निर्देशांक तालुकानिहाय वापरण्यात यावे.
- या निर्देशांकाचे तालुकानिहाय मुल्यांकन जूलै पासून फेब्रुवारी पर्यंत दरमहा करण्यात यावे.

- भूजल पातळी निर्देशांक (Groundwater Drought Index) चे मूल्य व त्यानुसार भूजल तूटीची वर्गवारी (Groundwater Deficit Class) खालीलप्रमाणे राहील :

भूजल पातळी निर्देशांक (Groundwater Drought Index)	भूजल तूट वर्गवारी (Groundwater Deficit Class)
-०.१५ पेक्षा जास्त	सामान्य
-०.१६ ते -०.३०	सौम्य
-०.३१ ते -०.४५	मध्यम
-०.४६ ते -०.६०	गंभीर
-०.६० पेक्षा कमी	अतिगंभीर

फ) दुष्काळी परिस्थितीचे समग्र मुल्यमापन करण्यासाठी उपरोक्त निर्देशांकासोबतच खालील सामाजिक व आर्थिक घटकांचाही विचार करण्यात यावा व दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६ च्या परिशिष्टामधील विहित नमुने वापरण्यात यावेत :-

१) चाऱ्याची उपलब्धता, चाऱ्याचे सरासरी व वर्तमान दर व चाराछावण्यांची माहिती (नमुना ५ व ६)
२) पिण्याच्या पाण्याची टंचाई (नमुना-७ व ८)
३) रोजगाराची वाढती मागणी किंवा रोजगारासाठी लोकांचे असामान्य स्थलांतरण (नमुना -९)
४) शेती व इतर क्षेत्रातील मजुरीचे सरासरी दराचे प्रचलित दराशी प्रमाण
५) अन्नधान्याचा पुरवठा व अत्यावश्यक वस्तूंचे दर (नमुना-१०)

वरील मुद्यांबाबतची माहिती स्थानिकरित्या उपजिल्हानिबंधक आणि स्थानिक मार्केट कमिटी तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकडून उपलब्ध करून घेण्यात यावी.

३. वरिल शास्त्रीय निर्देशांक विचारात घेवून दुष्काळ निश्चित करण्यासाठी पुढील प्रमाणे टप्प्या टप्प्याने कार्यपध्दती अनुसरण्यात यावी:-

१) <u>पहिला टप्पा</u>

- प्रथमत: अनिवार्य निर्देशांक (mandatory indicators) विचारात घेवून जिल्हयातील तालुकानिहाय पर्जन्यमानाचे विचलन व पर्जन्यात पडलेला खंड विचारात घेण्यात यावा. याचप्रमाणे परिच्छेद क्रमांक २(१)(अ)(iii) व २(१)(अ)(iv) मध्ये दिलेले निकष सुध्दा विचारात घेण्यात यावेत. दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ मधील प्रकरण ३.३ मधील सारणी क्रमांक ३.९ मध्ये विहित केल्याप्रमाणे या अनिवार्य निर्देशांकाची खालील मॅट्रीक्समध्ये मांडणी करून दुष्काळाची शक्यता सूचित होते काय याची तपासणी करावी.

पर्जन्याचे विचलन	**पर्जन्यातील खंड**	**दुष्काळ सूचित होतो काय ?**	**शेरा**
पर्जन्यमानात तूट किंवा अत्यल्प पर्जन्यमान	होय	होय	

पर्जन्यमानात तूट किंवा अत्यल्प पर्जन्यमान	नाही	नाही	पर्जन्यमान अत्यल्प असल्यास दुष्काळ सूचित होतो अन्यथा नाही.
सामान्य पर्जन्यमान	होय	होय	
सामान्य पर्जन्यमान	नाही	नाही	
जून व जूलै या महिन्यांमध्ये एकूण सरासरी पर्जन्याच्या ५०% पेक्षा कमी पाऊस	--	होय	
जून ते सप्टेंबर या कालावधीतील एकूण पर्जन्य सरासरी पर्जन्याच्या ७५% पेक्षा कमी असल्यास	-	होय	

स्पष्टीकरण -

१. पर्जन्यमानात तूट म्हणजे पर्जन्याचे विचलन - २०% ते - ५९% असल्यास

२. अत्यल्प पर्जन्यमान म्हणजे पर्जन्याचे विचलन - ६०% ते - ९९% असल्यास

३. पर्जन्यातील खंड म्हणजे मान्सून सूरू झाल्यानंतर पर्जन्य नसलेला ३ ते ४ आठवडयाचा कालावधी

४. पर्जन्यमानाचे विचलन (RF_{dev}) = $\left[\frac{\text{(वर्तमान पर्जन्य - सरासरी पर्जन्य)}}{\text{सरासरी पर्जन्य}}\right] \times १००$

(पर्जन्यमान मिलीमीटरमध्ये)

५. वर्तमान व सरासरी पर्जन्याची आकडेवारी विचारात घेताना ती सारख्याच कालावधीची असावी. उदा. जून अखेरचे पर्जन्यमानाचे विचलन काढताना जून महिन्या अखेरचे चालू/वर्तमान कालावधीत झालेले एकूण पर्जन्य व जून महिन्या अखेरचे सरासरी पर्जन्य विचारात घ्यावे. तसेच जूलै अखेरचे पर्जन्यमानाचे विचलन काढताना जून व जूलै अखेरचे वर्तमान कालावधीत झालेले एकूण पर्जन्य व जूलै अखेरचे सरासरी पर्जन्य विचारात घ्यावे.

६. प्रत्येक महिन्याचे पर्जन्यमानाचे विचलन किंवा सरासरी पर्जन्य काढताना तालुकास्तरावर काढण्यात यावे. याकरिता मदत व पुनर्वसन विभागाने, शासन निर्णय, दिनांक १८.३.२००६ अन्वये निश्चित केलेले तालुकानिहाय सरासरी पर्जन्य विचारात घ्यावे.

७. वर्तमान पर्जन्यमानाची तालुकानिहाय आकडेवारी www.krishi.maharashtra.gvo.in या संकेतस्थळावरून प्राप्त करून घ्यावी.

- या अनिवार्य निर्देशांकाचा तपशील शासन निर्णयासोबत प्रपत्र-अ येथे जोडलेल्या विवरणपत्रामध्ये भरून तयार करावा.
- या टप्प्याच्या तपासणीमध्ये ज्या तालुक्यासाठी दुष्काळाची पहिली कळ (Trigger १) लागू होत नसेल/दुष्काळ सुचित होत नसेल अशा तालुक्यांबाबत प्रभावदर्शक निर्देशांक तपासण्याची आवश्यकता नाही.

- या टप्प्याच्या तपासणीमध्ये ज्या तालुक्यासाठी दुष्काळाची पहिली कळ (Trigger) लागू होते /दुष्काळ सुचित होतो, अशा तालुक्यामधील दुष्काळी परिस्थितीचे मुल्यांकन करण्यासाठी दुसऱ्या टप्प्यात विहित केल्याप्रमाणे प्रभावदर्शक निर्देशांकाचे मुल्यांकन करण्यात यावे.
- या शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्र - "अ" व "ब" मधील विहित विवरणपत्रात (Proforma A & B) अनिवार्य निर्देशकांचा व प्रभावदर्शक निर्देशाकांचा सविस्तर तपशील भरून जिल्हास्तरीय समित्यांनी खरीप हंगामासंदर्भात जूलै, ऑगस्ट, सप्टेंबर या महिना अखेरचे त्यांच्या जिल्हयाचे मासिक अहवाल दरमहा पुढील महिन्याच्या ३ तारखेपर्यंत विभागीय आयुक्तांना पाठवावेत. विभागीय आयुक्तांनी त्यांच्या विभागाचा एकत्रित अहवाल राज्यस्तरीय समितीच्या सदस्य सचिवांकडे त्याच महिन्याच्या ७ तारखेपर्यंत पाठवावा.
- जिल्हास्तरीय समित्यांनी रब्बी हंगामाच्या बाबतीत ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी,फेब्रुवारी या महिन्यांचे मासिक अहवाल पुढील महिन्याच्या ३ तारखेपर्यंत विभागीय आयुक्तांना पाठवावेत व विभागीय आयुक्तांनी त्यांच्या विभागाचा एकत्रित अहवाल राज्यस्तरीय समितीच्या सदस्य सचिवांकडे त्याच महिन्याच्या ७ तारखेपर्यंत पाठवावा.
- राज्यस्तरीय समितीच्या सदस्य सचिवांनी राज्याचा उपरोक्त दरमहाचा एकत्रित अहवाल अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन) यांचेकडे त्याच महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवावा.

२) <u>दुसरा टप्पा</u>

- पहिल्या टप्प्यामध्ये दुष्काळाची प्रथम कळ (Trigger १) लागू झाल्यामुळे दुष्काळाची शक्यता सूचित होत असलेल्याच तालुक्यामधील दुष्काळी परिस्थितीचे मुल्यांकन करणे, त्याची तीव्रता निश्चित करून दुष्काळासंदर्भात पुढील कार्यवाही करण्याकरिता योग्य निर्णय घेण्यासाठी या शासन निर्णयाच्या परिच्छेद क्रमांक २(२) (अ) ते (ड) मध्ये नमूद केलेल्या ४ प्रभावदर्शक निर्देशांकामधील सर्व निर्देशांकांचे मूल्यांकन करावे.
- या प्रभावदर्शक निर्देशकांचा तपशील सोबत प्रपत्र-ब येथे जोडलेल्या विवरणपत्रामध्ये तयार करावा.
- ४ प्रभावदर्शक निर्देशाकांपैकी खराब स्थिती दर्शविणारे ३ निर्देशांक व अशा निवडलेल्या ३ निर्देशांकामधील खराब स्थिती दर्शविणारे कोणतेही एकच निर्देशांक विचारात घेण्यात यावे.
- प्रभावदर्शक निर्देशांकापैकी खराब स्थिती दर्शवित असल्यामुळे निवडलेल्या ३ निर्देशांकाच्या परिमाणांवर/मूल्यांवर खालीलप्रमाणे दुष्काळाचे स्वरूप व तीव्रता अवलंबून असेल:

    १. गंभीर दुष्काळ - निवडलेल्या सर्व तीनही निर्देशांकाचे मूल्य "गंभीर" वर्गवारीत येत असल्यास
    २. मध्यम दुष्काळ - निवडलेल्या तीन निर्देशांकापैकी कोणतेही २ निर्देशांक "मध्यम" किंवा "गंभीर" वर्गवारीत येत असल्यास
    ३. सामान्य परिस्थिती - वर नमूद केलेल्या परिस्थिती व्यतिरिक्त
    ४. तालुक्यातील सिंचनाखालील क्षेत्राचे एकूण क्षेत्राशी असलेले प्रमाण ७५% पेक्षा जास्त असल्यास दुष्काळाची तीव्रता एका टप्प्याने खाली आणण्याचा विकल्प राज्य शासनास राहील. परंतु यामुळे दुष्काळाची तीव्रता "मध्यम" वरून "सामान्य" परिस्थितीमध्ये येत असल्यास, अशा परिस्थितीतही तिसऱ्या टप्प्याची कार्यवाही करण्यात यावी.

- प्रथम कळ (Trigger १) लागू झालेल्या तालुक्यामधील प्रभावदर्शक निर्देशांकाच्या या टप्प्यामधील तपासणीनुसार ज्या तालुक्यामध्ये दुष्काळाची तीव्रता "मध्यम" किंवा "गंभीर" प्रकारात असल्याचे निर्दशनास येईल अशा तालुक्यामध्ये दुष्काळाची दुसरी कळ (Trigger २) लागू होईल.
- या शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्र - "अ" व "ब" मधील विहित विवरणपत्रात सविस्तर तपशील दरमहा भरून जिल्हास्तरीय समित्यांनी खरीप हंगामासंदर्भात जूलै, ऑगस्ट, सप्टेंबर या महिन्यांचे मासिक अहवाल दरमहा पुढील महिन्याच्या ३ तारखेपर्यंत विभागीय आयुक्तांना पाठवावेत. विभागीय आयुक्तांनी त्यांच्या विभागाचा एकत्रित अहवाल राज्यस्तरीय समितीच्या सदस्य सचिवांकडे त्याच महिन्याच्या ७ तारखेपर्यंत पाठवावा.
- जिल्हास्तरीय समित्यांनी रब्बी हंगामाच्या बाबतीत ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी या महिन्यांचे अहवाल त्यापुढील महिन्याच्या ३ तारखेपर्यंत विभागीय आयुक्तांना पाठवावेत व विभागीय आयुक्तांनी त्यांच्या विभागाचा एकत्रित अहवाल राज्यस्तरीय समितीच्या सदस्य सचिवांकडे त्याच महिन्याच्या ७ तारखेपर्यंत पाठवावा
- राज्यस्तरीय समितीच्या सदस्य सचिवांनी राज्याचा दरमहाचा एकत्रित अहवाल अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन) यांचेकडे त्याच महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवावा.
- ज्या तालुक्यांच्या बाबतीत दुष्काळाची पहिली कळ (Trigger १) व दुसरी कळ (Trigger २) लागू होईल अशा तालुक्यासंदर्भातील या शासन निर्णयाच्या परिच्छेद क्रमांक २(फ) मध्ये नमूद केलेल्या मुद्यांची माहिती विहित विवरणपत्रात या शासन निर्णयासोबतच्या प्रपत्र "अ" व "ब" सोबत पाठवावी.

३) तिसरा टप्पा (Ground Truthing or Verification)

- टप्पा एक व टप्पा दोन यांच्या मूल्यांकनाअंती राज्य शासनास राज्य स्तरीय समितीकडून प्राप्त झालेला अहवाल विचारात घेतल्यानंतर, दुसऱ्या टप्प्याच्या मूल्यांकनाअंती जिल्हयातील ज्या ज्या तालुक्यामध्ये " मध्यम" किंवा " गंभीर" दुष्काळ सुचित होत असेल अशा तालुक्यामधील **गावातील पीकांचे क्षेत्रिय सर्वेक्षण करण्याबाबत राज्य शासनाकडून संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना कळविले जाईल**.
- राज्य शासनाकडून कळविण्यात आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांकडून संबंधित तालुक्यातील गावातील पीकांचे क्षेत्रिय सर्वेक्षण करण्यात यावे.
- दुष्काळाने प्रभावित झालेल्या गावांमधून रॅडम पध्दतीने १०% गावे निवडून अशा प्रत्येक गावातील प्रत्येक प्रमुख पिकांसाठी ५ ठिकाणे निवडून तेथील पिकांचे सर्वेक्षण करून पिक नुकसानीच्या स्थितीची छाननी/तपासणी करावी. एक एकरपेक्षा कमी क्षेत्र असलेल्या isolated शेतीचे सर्वेक्षण टाळावे.
- विशिष्ट मोबाईल ॲपचा वापर करून हे सर्वेक्षण करण्यात यावे. अशा क्षेत्रातील पिकांची स्थिती दर्शविणारे छायाचित्र व सर्वेक्षण करण्यात येत असलेल्या क्षेत्राचे/ठिकाणाचे GPS Coordinates येतील, अशा पध्दतीने मोबाईल ॲपच्या सहाय्याने छायाचित्रे घेण्यात यावीत. सदर GPS coordinates व पिकांची छायाचित्रे ही मापदंडे नंतरच्या विश्लेषणासाठी संगणकीय प्रणालीमध्ये upload करण्यायोग्य राहतील याचीही दक्षता घेण्यात यावी.
- या सर्वेक्षणाअंती पीकनुकसानीचे प्रमाण ३३% पेक्षा जास्त दिसून आल्यास अशी गावे दुष्काळी म्हणून घोषित केली जाण्यास पात्र असतील. पीकनुकसानीचे प्रमाण ५०%

पेक्षा जास्त असल्यास दुष्काळाची तीव्रता गंभीर समजली जाईल. हंगामी/सुधारित किंवा अंतिम पैसेवारी काढण्याच्या कालावधीत असे सर्वेक्षण करण्याची वेळ आल्यास दोन्ही सर्वेक्षणे एकाचवेळी करण्यात यावीत.

- वरीलप्रमाणे गावनिहाय केलेल्या सर्वेक्षणानंतर गावनिहाय पीकनुकसानीचा तपशील, दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ सोबतच्या परिशिष्ट १ मधील नमुना क्रमांक ११ मध्ये तयार करावा व शासनास कोणत्याही परिस्थितीत खरीप हंगामाच्या बाबतीत दिनांक २० ऑक्टोबर पूर्वी व रब्बी हंगामाच्या बाबतीत दिनांक २० मार्च पूर्वी पाठवावा.
- खरीप हंगामाच्या बाबतीत राज्य शासनाकडून दुष्काळ घोषित करण्याची अंतिम तारीख ३० ऑक्टोबर व रब्बी हंगामाच्या बाबतीत दुष्काळ घोषित करण्याचा अंतिम दिनांक ३१ मार्च आहे. दुष्काळाची तीव्रता गंभीर असल्यास केंद्र शासनाकडून राज्य शासनास NDRF अंतर्गत मदत मंजूर केली जाणार आहे.
- गंभीर स्वरूपाचा दुष्काळ घोषित केल्यानंतर एक आठवडयाच्या आत केंद्र शासनास राज्य शासनाकडून मदतीचे ज्ञापन पाठविले जाणे अनिवार्य आहे.

४. यापुढे राज्य शासन स्तरावरून दुष्काळ घोषित करण्यासाठी गाव हा घटक राहणार असल्यामुळे अनिवार्य व प्रभावदर्शक निर्देशांकाची माहिती व्यवस्थितपणे संकलित करावी. या शासन निर्णयातील सूचना विचारात घेवून कार्यवाही करताना व विविध शास्त्रीय निर्देशांकाचे विश्लेषण व मुल्यांकन करताना दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६ मधील तरतूदींचेही अवलोकन करण्यात यावे.

५. विविध जिल्हास्तरीय समित्यांकडून दरमहा प्राप्त होणारा तपशील, राज्यस्तरीय दुष्काळ देखरेख समितीच्या सदस्य सचिवांकडून राज्यस्तरीय समितीस सादर केला जाईल. सदर तपशीलाच्या आधारे राज्यस्तरीय दुष्काळ देखरेख समितीकडून अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन) यांना पाठविण्यात येणाऱ्या अहवालात दुष्काळ घोषित करण्याबाबत व दुष्काळाच्या तीव्रतेबाबत शिफारस करेल.

६. राज्यामध्ये दुष्काळ घोषित करण्याची अंतिम तारीख खरीप हंगामाच्या बाबतीत ३० ऑक्टोबर व रब्बी हंगामाच्या बाबतीत ३१ मार्च राहील. ही मुदत केंद्र शासनाने विहित केलेली असल्याने ती शिथीलक्षम राहणार नाही. त्यामुळे जिल्हास्तरीय समित्यांनी, दुष्काळी परिस्थितीचे मुल्यांकन केल्यानंतर त्यांच्या जिल्हयासंदर्भातील विहित विवरणपत्रातील तपशीलासह सविस्तर प्रस्ताव दरमहा या शासन निर्णयात पूर्वी विहित केलेल्या वेळापत्रकानुसार विभागीय आयुक्तांमार्फत राज्यस्तरीय दुष्काळ देखरेख समितीकडे सादर करण्याची दक्षता घ्यावी. सदर वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. या वेळापत्रकाचे पालन न झाल्यास दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६ मध्ये दुष्काळ घोषित करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकापूर्वी राज्यातील दुष्काळग्रस्त गावांमध्ये दुष्काळ घोषित करणे शक्य होणार नाही.

७. दुष्काळाची तीव्रता गंभीर असल्यास, राज्य शासनाने दुष्काळ घोषित केल्यानंतर एक आठवडयाच्या आत केंद्र शासनास मदतीचे ज्ञापन पाठविणे बंधनकारक आहे. त्यामुळे कृषी विभागाने केंद्र शासनास मदतीचे ज्ञापन पाठविण्याची पूर्वतयारी प्रत्यक्षात दुष्काळ घोषित करण्यापूर्वीच करावी व दुष्काळ घोषित केल्यानंतर शक्यतोवर त्याच दिवशी मदतीचे ज्ञापन (Memorandum) विहित नमुन्यात , अनिवार्य व प्रभावदर्शक निर्देशांकाच्या तपशीलासह महसूल व वन विभागास उपलब्ध करून दयावे. तसेच पाणी पुरवठा, चारा उपलब्धतेसाठी झालेला खर्च व अपेक्षित असलेल्या खर्चाचा तपशील व चारा छावण्या सुरू केल्या असल्यास त्यावर झालेल्या खर्चाचा समावेश केंद्र शासनाकडे सादर करावयाच्या

ज्ञापनामध्ये होण्याकरिता संबधित विभागांनी देखील त्यासंदर्भातील सविस्तर तपशील महसूल व वन विभागास वर नमूद केलेल्या कालमर्यादेत उपलब्ध करून दयावा.

८. वरील परिच्छेदांमध्ये विहित केलेल्या शास्त्रीय निर्देशांकांवर देखरेख ठेवण्यासाठी व जिल्हा स्तरीय दुष्काळ देखरेख समितीकडून प्राप्त होणारे अहवाल विचारात घेवून राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर नियंत्रण ठेवून त्याचे मुल्यांकन करण्यासाठी व यासंदर्भात शासनास शिफारस करण्यासाठी खालीलप्रमाणे राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समिती (Drought Monitoring Committee) गठीत करण्यात येत आहेत:

१) <u>राज्यस्तरीय दुष्काळ देखरेख समिती (State Level Drought Monitoring Committee)</u>

राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर देखरेख ठेवण्यासाठी जिल्हास्तरीय समित्यांकडून प्राप्त होणारे विविध शास्त्रीय निर्देशाकांचे मुल्यांकन विचारात घेऊन दुष्काळा संदर्भात राज्य शासनास सल्ला व मार्गदर्शन करण्याकरिता आयुक्त,कृषी,महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे राज्यस्तरीय दुष्काळ देखरेख समिती (State Level Drought Monitoring Committee) गठीत करण्यात येत आहे.

१)	आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे	- अध्यक्ष
२)	आयुक्त (पशुसंवर्धन), महाराष्ट्र राज्य, पुणे	- सदस्य
३)	संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे	- सदस्य
४)	मुख्य अभियंता,जलविज्ञान प्रकल्प, नाशिक	- सदस्य
५)	संचालक, महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग अप्लीकेशन सेंटर, नागपूर किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेली तज्ञ व्यक्ती	- सदस्य
६)	समितीस आवश्यक वाटतील असे अन्य अधिकारी	- निमंत्रित सदस्य
७)	संचालक (कृषी),महाराष्ट्र राज्य, पुणे	- सदस्य सचिव

जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समिती व विभागीय आयुक्तांकडून त्यांना प्राप्त होणाऱ्या अहवालामधील संबंधित जिल्हयातील विविध शास्त्रीय निर्देशाकांच्या तपशीलाचे विश्लेषण करून ही समिती राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर देखरेख करेल. सदर समिती त्यांचा अहवाल या शासन निर्णयामध्ये विहित केलेल्या कालावधीत अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन) यांना वेळोवेळी सादर करेल. तसेच या तपशीलानुसार राज्यातील ज्या तालुक्यामध्ये दुष्काळी परिस्थिती सूचित होत असेल अशा तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित करण्याबाबत सदर समिती अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन) यांना अहवाल सादर करेल. या समितीचे अभिलेख सदस्य सचिवांकडे ठेवण्यात येईल.

राज्यस्तरीय समितीच्या बैठकांसाठी, दुष्काळी परिस्थिती दिसून येत असलेल्या तालुका/जिल्हयासंदर्भात संबंधित विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांना देखील आमंत्रित करण्यात यावे. अशा बैठकीसाठी त्यांची उपस्थिती अनिवार्य राहील.

२) <u>जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समिती (District Drought Monitoring Committee)</u> :-

राज्यस्तरीय दुष्काळ देखरेख समितीच्या धर्तीवर प्रत्येक जिल्हयात दुष्काळी परिस्थितीवर देखरेख करण्यासाठी संहितेमध्ये विहित करण्यात आलेल्या विविध शास्त्रीय निर्देशाकांची माहिती उपलब्ध करुन घेणे, त्याचे विश्लेषण करून जिल्हयामधील तालुक्यामध्ये/गावांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण होत आहे किंवा कसे याचे मुल्यांकन करण्यासाठी

व त्यासंदर्भातील अहवाल प्रत्येक आठवडयाला राज्यस्तरीय देखरेख समितीस सादर करण्याकरिता प्रत्येक जिल्हयात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समिती गठीत करण्यात येत आहे:

१)	जिल्हाधिकारी	-	अध्यक्ष
२)	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद	-	सदस्य
३)	जलसंपदा विभागाचे जिल्हास्तरीय विभाग प्रमुख	-	सदस्य
४)	वरिष्ठ भूवैज्ञानिक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा	-	सदस्य
५)	महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग अप्लीकेशन सेंटर,नागपूर या संस्थेतील तज्ञ व्यक्ती (आवश्यकतेनुसार)	-	निमंत्रित सदस्य
६)	निवासी उपजिल्हाधिकारी	-	सदस्य
७)	जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी	-	सदस्य सचिव
८)	समितीस आवश्यक वाटतील असे अन्य अधिकारी	-	निमंत्रित सदस्य

या समित्यांनी आपआपल्या जिल्हयातील दुष्काळी परिस्थितीवर देखरेख ठेवण्यासाठी दुष्काळासंदर्भात विहित करण्यात आलेल्या व या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या विविध शास्त्रीय निर्देशाकांचा तपशील प्राप्त करावा व त्याचे विश्लेषण करून त्याबाबतचा अहवाल विहित विवरणपत्रात या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या कालावधीत संबंधित विभागीय आयुक्तांमार्फत राज्यस्तरीय दुष्काळ देखरेख समितीच्या सदस्य सचिवांकडे सादर करावा.

३) <u>आपत्ती व्यवस्थापन समिती (Crisis Management Group)</u> :-

राज्यामध्ये दुष्काळी परिस्थिती उद्भवल्यानंतर त्या परिस्थितीवर मात करण्यासाठी विविध प्रशासकीय विभागाकडून कार्यवाही करणे अपेक्षित असलेल्या विविध उपाययोजनामध्ये समन्वय राखण्यासाठी राज्यस्तरावर खालीलप्रमाणे आपत्ती व्यवस्थापन समिती गठीत करण्यात येत आहे :

१)	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (मदत व पुनर्वसन)	-	अध्यक्ष
२)	अमुस/प्रधान सचिव (कृषी)	-	सदस्य
३)	प्रधान सचिव/सचिव (पदुम)	-	सदस्य
४)	प्रधान सचिव (व्यय),वित्त विभाग	-	सदस्य
५)	प्रधान सचिव/सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग)	-	सदस्य
६)	प्रधान सचिव/सचिव (अन्न व नागरी पुरवठा)	-	सदस्य
७)	प्रधान सचिव/सचिव (सार्वजनिक आरोग्य विभाग)	-	सदस्य
८)	प्रधान सचिव/सचिव (रोहयो व जलसंधारण)	-	सदस्य
९)	प्रधान सचिव/सचिव (ऊर्जा)	-	सदस्य
१०)	प्रधान सचिव/सचिव (ग्रामविकास व जलसंधारण विभाग)	-	सदस्य
११)	प्रधान सचिव/सचिव (महिला व बालविकास विभाग)	-	सदस्य
१२)	प्रधान सचिव/सचिव (जलसंपदा विभाग)	-	सदस्य
१३)	संचालक (आपत्ती व्यवस्थापन)	-	सदस्य
१४)	उपसचिव (म-७),महसूल व वन विभाग	-	सदस्य सचिव

४) <u>जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन समिती (District Crisis Management Group)</u>

राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन समितीच्या धर्तीवर जिल्हास्तरावर देखील विविध विभागांच्या कार्यवाहीमध्ये समन्वय राखण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आपत्ती व्यवस्थापन समिती आवश्यक आहे. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अनुसार जिल्हास्तरावर गठीत करण्यात आलेल्या जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडेच दुष्काळासंदर्भातील आपत्ती व्यवस्थापनाचे कामकाज सोपविण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१००७१६५८१८२११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
Date: 2017.10.07 17:27:51 +05'30'

(सु.ह.उमराणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन,मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय,मुंबई ,
३. मा विरोधी पक्ष नेते, विधानसभा/विधान परिषद, विधानभवन,मुंबई,
४. महाराष्ट्र विधानमंडळातील सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य,
५. मा.मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई,
६. अपर मुख्य सचिव (वित्त),मंत्रालय,मुंबई
७. प्रधान सचिव (महसूल),मंत्रालय,मुंबई
८. प्रधान सचिव/सचिव (कृषी), मंत्रालय,मुंबई,
९. प्रधान सचिव/सचिव (नियोजन), मंत्रालय,मुंबई,
१०. प्रधान सचिव/सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता), मंत्रालय,मुंबई,
११. प्रधान सचिव/सचिव (पदुम), मंत्रालय,मुंबई,
१२. प्रधान सचिव/सचिव (जलसंपदा), मंत्रालय,मुंबई,
१३. प्रधान सचिव/सचिव (सार्वजनिक आरोग्य विभाग), मंत्रालय,मुंबई
१४. प्रधान सचिव/सचिव (राहयो व जलसंधारण), मंत्रालय,मुंबई
१५. प्रधान सचिव/सचिव (ग्रामविकास विभाग), मंत्रालय,मुंबई
१६. प्रधान सचिव/सचिव (अन्न , नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग),मंत्रालय,मुंबई
१७. प्रधान सचिव/सचिव (उर्जा),उद्योग,उर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई
१८. प्रधान सचिव/सचिव (महिला व बाल विकास विभाग),मंत्रालय,मुंबई

१९. विभागीय आयुक्त,कोकण/पुणे/औरंगाबाद/नागपूर/अमरावती/नाशिक
२०. आयुक्त (कृषी),महाराष्ट्र राज्य,पुणे,
२१. आयुक्त (पशुसंवर्धन),महाराष्ट्र राज्य, पुणे
२२. मुख्य अभियंता,जलविज्ञान प्रकल्प, नाशिक
२३. सर्व जिल्हाधिकारी
२४. मुख्य कार्यकारी अधिकारी,सर्व जिल्हा परिषदा
२५. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी (सर्व)
२६. मा.मंत्री(मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
२७. मा.राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
२८. संचालक, महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग अप्लीकेशन सेंटर,नागपूर,
२९. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे,
३०. संचालक (कृषी),महाराष्ट्र राज्य,पुणे
३१. संचालक,आपत्ती व्यवस्थापन,मंत्रालय,मुंबई
३२. निवड नस्ती (कार्यासन - म/७).

	शासन निर्णय,महसूल व वन विभाग , क्रमांक :संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/म-७, दिनांक: ७ ऑक्टोबर, २०१७ चे प्रपत्र-अ								
	Monitoring of Mandartory Indicators for Drought Assessment in Maharshtra (To be Filled for every Month From June)								
			PROFORMA-A						
Month -									
		Mandatory Indicators							
District	**Taluka**	**Rainfall Deviation . Rainfall deviation (Rfdev)= (Rfi-RFn)/RFn x 100 Rfi is actual rainfall received cumulatively for any particular month in mm and RFn is normal rainfall for the same period in mm**	**Category of Rainfall Deviation Normal/Deficient/Scanty (Deviation upto -19% is Normal, -20% to -59% is Deficient, -60% to-99% is scanty (N/D/S)**	**Dry Spell of 3-4 weeks (upto 3 weeks in case of light soils) Yes /No and mention the period of dry spell**	**Drought Trigger I Yes/No**	**percentage of total rainfall received during months of June and July to the normal rainfall of June and July . (If the value is less than 50%, then the trigger will be yes)**	**percentage of total rainfall received during months from June to september to the normal rainfall of this period (If the value is less than 75%, then the trigger will be yes)**	**Percentage of total rainfall received during October and November months to the normal rainfall of October and November (If the value is less than 50%, then the trigger will be yes)**	**Drought Trigger I Yes/No**
1	**2**	**3**	**4**	**5**	**6**	**7**	**8**	**9**	**10**

शासन निर्णय,महसूल व वन विभाग, क्रमांक: संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/म-७, दिनांक: ७ ऑक्टोबर, २०१७ चे प्रपत्र-ब

Monitoring of Impact Indicators for Drought Assessment in Maharshtra (To be Filled for every Month From June)

Month --

PROFORMA-B

Name of Taluka where the Drought Trigger is Yes as per PROFORMA-A		Impact Indicators: Agriculture Related Index				Remote Sensing based Index									Soil Moisture based Index		Hydrological Index		Irrigated Land
District	Taluka	Crop area sown (Talukawise)by the end of August/ December	Normal Crop area sown (Talukawise) by the end of August/ December	Percentage of crop area sown to the normal crop area sown at the end of August/ December	Category (Normal/Moderate/ Severe) (Normal if the value of column 6 is more than 66.7%, Moderate if the value is less than 66.7 % and Severe if the value is 50% or less, 22)	VCI (NDVI) for the reporting month (Talukawise)	VCI (NDWI) for the reporting month (Talukawise)	Poorer of the two values of VCI (NDVI) and VCI(NDWI)	Category of VCI (Good/Fair/poor/very poor)(60-100 is Good, 40-60 is Fair, 20-40 is Poor and 0-20 is Very Poor) (The poorer of the two values in column 8 and 9 may be taken)	NDVI Deviation for the reporting month (Talukawise)	Category of NDVI (Normal/ Moderate/ Severe) (-20 to -30% is Moderate , <-30% is severe	NDWI Deviation for the reporting month (Talukawise)	Category of NDWI (Normal/ Moderate/ Severe) (> -20% is normal, -20 to -30% is Moderate , <-30% is severe	Poorer category of the two values of NDVI and NDWI deviations	Moisture Adequacy Index (MAI) (%) for the reporting month (Districtwise)	Category (Normal/Mild/ Moderate/Severe) (76-100% is Normal, 51-75% is Mild, 26-50% is Moderate, 0-25% is severe	Groundwater Drought Index (GWDI)for the reporting month (Talukawise)	Category (Normal/Mild/ Moderate/Severe /Extreme)(> -0.15 is Normal, -0.16 to -0.30 is Mild, -0.31 to -0.45 is Moderate, -0.46 to -0.60 is severe and < -0.60 is Extreme	Percentage of total land Irrigated to the total land under cultivation of the taluka
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12	13	14	15	16	17	18	19	20